
ePaper

महादेव बेटिंग ॲपचा मुख्य सूत्रधार सौरभ चंद्राकरला ईडीकडून अटक

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज™



पान 3 वरुन...

संविधानिक मूल्यांचा जागर शहरभर करा!

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 14 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

जलसाठा २५.६२ टक्क्यांनी घटला; मराठवाडा 'डेंजर झोन'मध्ये..!

भीषण 'पाणीसंकट' उंबरठ्यावर!

महाईन्यूज । नागपूर

पावसाळा संपल्यानंतर राज्यातील धरणांमधील पाणीसाठ्यात मोठी घट झाल्याचे चित्र समोर आले आहे. गतवर्षी १२ नोव्हेंबरला राज्यातील धरणांमध्ये ९०.५३ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. यंदा याच दिवशी तो ६४.९१ टक्क्यांवर आला आहे. वर्षभरात तब्बल २५.६२ टक्क्यांची घट झाली असून, उन्हाळ्याचे चार महिने शिल्लक असतानाच आगामी काळात पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

परिस्थिती चिंताजनक

जलसंपदा विभागाच्या १२ नोव्हेंबर २०२६ च्या अहवालानुसार, सहा महसुली विभागांमध्ये उपयुक्त पाणीसाठ्याची मोठी तफावत आहे. कोकण विभागात सर्वाधिक ३,०१९.६० दलघमी (८२.४३ टक्के) पाणीसाठा असून, पुण्यात ११,५९२.९३ दलघमी (७५.४४ टक्के) आणि नाशिकमध्ये ५,२३६.२० दलघमी (७४.४५ टक्के) पाणीसाठा आहे. याउलट नागपूर विभागात ३,६४७.३१ दलघमी (५७.४५ टक्के), अमरावतीत २,११३.५६ दलघमी (५२.९६ टक्के), तर छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वांत कमी २,७४८.६८ दलघमी (३७.५८ टक्के) पाणी शिल्लक आहे. मराठवाड्यातील पाणीसाठा मागील वर्षीपेक्षा ५७.७७ टक्के कमी आहे.

लघू व मध्यम प्रकल्पही तळाला

लघू प्रकल्पांची स्थिती अधिक खालावलेली आहे. मोठ्या प्रकल्पांमध्ये ७२.०३ टक्के, मध्यम प्रकल्पांमध्ये ५६.९५ टक्के, तर लघू प्रकल्पांमध्ये अवघा ३६.८९ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी याच दिवशी मोठ्या प्रकल्पांमध्ये ९६.८७ टक्के साठा होता. त्यामुळे मोठ्या प्रकल्पांमध्येही गतवर्षीच्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे. राज्यातील सर्व प्रकारच्या प्रकल्पांमध्ये व बहुतांश विभागात गतवर्षीच्या तुलनेत कमी पाणीसाठा असल्याचे अहवालातून स्पष्ट होते.

नागपूर व अमरावती विभागांची स्थितीही असमाधानकारक

सध्या राज्यातील एकूण ३,०४२ मोठ्या, मध्यम व लघू प्रकल्पांमध्ये सध्या २६,६१९.४३ दलघमी जिवंत पाणीसाठा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर विभागात अवघा ३७.५८ टक्के म्हणजेच २,७४८.६८ दलघमी पाणीसाठा शिल्लक आहे. विदर्भातील नागपूर व अमरावती विभागांची स्थितीही समाधानकारक नाही. त्यामुळे आगामी उन्हाळ्यात पिण्याचे पाणी आणि शेतीच्या सिंचनाचे नियोजन प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरणार आहे.

जलसंपदा विभागाच्या १२ नोव्हेंबर २०२६ च्या अहवालानुसार, राज्यातील ३ हजार ४२ मोठ्या, मध्यम आणि लघू प्रकल्पांमध्ये एकूण २६ हजार ६१९.४३ दलघमी जिवंत पाणीसाठा उपलब्ध आहे. सहा महसुली विभागांमध्ये पाणीसाठ्याचे प्रमाण वेगवेगळे आहे. कोकण विभागात सर्वाधिक ८२.४३ टक्के, पुणे विभागात ७५.४४ टक्के, तर नाशिक विभागात ७४.४५ टक्के पाणीसाठा आहे. दुसरीकडे नागपूर विभागात ५७.४५ टक्के, अमरावती विभागात ५२.९६ टक्के आणि छत्रपती संभाजीनगर विभागात अवघा ३७.५८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

मराठवाड्यातील परिस्थिती विशेष चिंताजनक आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील धरणांमध्ये केवळ २ हजार ७४८.६८ दलघमी पाणी उपलब्ध असून, गतवर्षीच्या तुलनेत पाणीसाठ्यात ५७.७७ टक्क्यांची घट झाली आहे. त्यामुळे या भागातील ग्रामीण आणि शहरी पाणीपुरवठ्यासह शेतीच्या सिंचनाचा प्रश्न ऐरणीवर येण्याची शक्यता आहे. विदर्भातील नागपूर आणि अमरावती विभागांतही पाणीसाठ्याचे प्रमाण गतवर्षीच्या तुलनेत कमी आहे.



रब्बी हंगामासाठीचे आवर्तन रविवारी बंद

मुठा उजव्या कालव्यातून आतापर्यंत साडेतीन 'टीएमसी' पाणी शेतीला

महाईन्यूज । पुणे

अपुऱ्या पावसामुळे जिल्ह्यात दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सुरू करण्यात आलेले रब्बी हंगामातील आवर्तन रविवारपासून (१५ नोव्हेंबर) बंद करण्यात येणार आहे. या आवर्तनासाठी मुठा उजव्या कालव्यातून आतापर्यंत साडेतीन अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी सोडण्यात आले असून, एकूण साडेचार टीएमसी पाणी सोडले जाणार आहे.

दरम्यान, उन्हाळी आवर्तनाबाबत अनिश्चितता असून, ते रद्द केली जाण्याची दाट शक्यता आहे. मात्र, त्याबाबत निर्णय जानेवारी महिन्यात होणाऱ्या कालवा समितीच्या बैठकीत घेतला जाणार आहे. रब्बी हंगामासाठी साधारपणे ऑक्टोबर महिन्याच्या मध्यापासून कालव्यातून पाणी सोडले जाते. मात्र, यंदा 'एल-निनो'चा प्रभावामुळे पावसात खंड पडल्यामुळे जिल्ह्यातील पिकांचे नुकसान टाळण्यासाठी पंचवीस सप्टेंबरपासून खडकवासला धरणाच्या मुठा उजव्या कालव्यातून रब्बी हंगामासाठी आवर्तन सुरू करण्यात आले. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या सहमतीने जलसंपदा विभागाने हा निर्णय घेतला होता.

सध्या आवर्तन सुरू असून, आतापर्यंत सव्वातीन टीएमसी पाणी कालव्यातून हवेली, दौंड आणि इंदापूर तालुक्यासाठी देण्यात आले आहे. मात्र, धरणातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता पाणी काटकसरीने वापरण्याची आवश्यकता असल्यामुळे सिंचनाच्या पाण्यातही काटकसर करावी लागणार आहे. त्यामुळे पंधरा नोव्हेंबर रोजी कालवा आवर्तन बंद करण्यात येणार आहे. कालव्यातून जवळपास ५१ दिवस पाणी सोडण्यात आल्याचेही यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे. साधारणपणे कालवा आवर्तन ४५ दिवसांचे असते.



रब्बीचे आवर्तन पूर्ण केल्यानंतर उन्हाळ्यासाठी पाणी उपलब्ध नसल्याने आवर्तन रद्द करण्याचेही विचाराधीन आहे. त्यामुळे उन्हाळी हंगामातील सिंचनाबाबत चिंता व्यक्त होत आहे. मात्र, त्याबाबतचा निर्णय जानेवारी महिन्यात होणाऱ्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत होण्याची शक्यता जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून वर्तविण्यात आली. यापूर्वी पालखीसाठी ७ ते १५ जुलै या कालावधीत पहिले आवर्तन देण्यात आले होते. त्यानंतर १६ जुलै ते २४ सप्टेंबर या काळात खरीप हंगाम आणि पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन सुरू ठेवण्यात आले. या आवर्तनात एकूण ६.३८ टीएमसी पाण्याचा वापर करण्यात आला होता. मात्र, उन्हाळी आवर्तनाबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. जानेवारी महिन्यात होणाऱ्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत धरणातील उपलब्ध पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची गरज आणि सिंचनाची मागणी यांचा आढावा घेऊन अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

५१ दिवसांनंतर आवर्तन बंद

मुठा उजव्या कालव्याचे रब्बी आवर्तन यंदा जवळपास ५१ दिवस सुरू राहिले. सामान्यतः कालव्याचे आवर्तन सुमारे ४५ दिवसांचे असते. मात्र, पावसाने ओढ दिल्यामुळे शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन यंदा आवर्तनाचा कालावधी वाढविण्यात आला. आता खडकवासला धरण साखळीतील उपलब्ध पाणीसाठ्याचे पुढील महिन्यांसाठी नियोजन करणे आवश्यक असल्याने सिंचनासाठीच्या पाण्यातही काटकसर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धरणातील पाणीसाठा शहराच्या पिण्याच्या पाण्याची गरज, ग्रामीण भागातील पाणीपुरवठा लक्षात घेऊन राखून ठेवणे आवश्यक आहे.

पुणे शहराच्या हवेतील वाढत्या सूक्ष्म धुलिकणांचा धोका?

महाईन्यूज । पुणे

लक्ष्मीपूजनानंतर झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे शहराची हवा बिघडल्याचे दिसले. मात्र, शहरातील हवेतील सूक्ष्म धुलिकणांचे प्रमाणही राष्ट्रीय मानकांपेक्षा अधिक असल्याचे वायू सर्वेक्षणातून अधोरेखित होत असून, शहरातील धुलिकणांचे वाढते प्रमाण धोकादायक ठरत असल्याची स्थिती आहे.



हवेमध्ये विविध प्रकारचे सूक्ष्म धुलिकण असतात. त्यातील 'पीएम १०' म्हणजे हवेत तरंगणारे १० मायक्रोमीटर किंवा त्यापेक्षा कमी व्यासाचे सूक्ष्म धूलिकण असतात. बांधकामांतून उडणारी धूळ, वाहनांतील धूर अशा विविध माध्यमांतून सूक्ष्म धुलिकणांचे हवेतील प्रमाण वाढते. केंद्र सरकारकडून देशभरातील शहरांचे स्वच्छ वायू सर्वेक्षण करण्यात येते. अलीकडेच जाहीर झालेल्या वायू सर्वेक्षणाच्या निकालात गेल्यावर्षी देशात १०स्थानी असलेल्या पुण्याची १२व्या स्थानी घसरण झाली. या सर्वेक्षणातून हवेतील धुलिकणांच्या वाढलेले प्रमाणही अधोरेखित झाले आहे. पुण्यातील हवेतील सूक्ष्म धूलिकणांचे (पीएम १०) वार्षिक सरासरी प्रमाण २०२५-२६ मध्ये १०१ मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर असल्याचे, तर २०२४-२५ मध्ये हे प्रमाण ९६ मायक्रोग्रॅम असल्याचे नमूद करण्यात आले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या राष्ट्रीय वातावरणीय हवा गुणवत्ता मानकांनुसार पीएम १०ची वार्षिक मर्यादा ६० मायक्रोग्रॅम प्रतिघनमीटर आहे. त्यामुळे शहरातील सूक्ष्म धुलिकणांचे प्रमाण राष्ट्रीय मानकापेक्षा जास्त असल्याचे दिसते.

लक्ष्मीपूजनानंतर झालेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे शहरातील सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक अतिवाईट, धोकादायक पातळीवर पोहोचला होता. त्यामुळे हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा समोर आला. त्याबरोबर हवेतील वाढत्या धुलिकणांचा प्रश्नही गंभीर होत असल्याचे दिसून येते.

'पीएम १०' धुलिकण कसे घातक ठरू शकतात?


'पीएम १०' हे कण श्वसनाद्वारे शरीरात प्रवेश करू शकतात. त्यामुळे या धुलिकणांच्या हवेतील वाढत्या प्रमाणाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता निर्माण होते. प्रामुख्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, श्वसनाचे आजार असलेल्या व्यक्तींना त्याचा त्रास होतो. सूक्ष्म धुलिकणांचा आरोग्यावर घातक परिणाम होतो. त्यामुळे धुलिकणांचे प्रमाण नियंत्रणात राहणे गरजेचे आहे. फटाक्यांमध्ये हानिकारक रासायनिक घटक असतात. तसेच, बांधकामांमुळेही धुलिकणांचे प्रमाण वाढते. हवेतील धुलिकणांचे प्रमाण कमी राहण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियम पाळले जाणे आवश्यक आहे. आपल्याकडे नियम, निकष आहेत, पण त्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न आहे.

संविधानिक मूल्यांचा जागर शहरभर करा!

संविधान उद्देशिका वाचन, संविधान दौड, व्याख्याने आणि स्पर्धांचे आयोजन करण्याची डॉ. कांबळे यांची मागणी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

भारतीय संविधानातील लोकशाही मूल्ये, नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या घटनात्मक तत्त्वांचा विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन व्यापक स्वरूपात साजरा करण्यात यावा, अशी मागणी नगरसेवक डॉ. सुहास लक्ष्मण कांबळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन सादर केले असून, आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पुढाकार घेण्यात आला आहे.



महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २४ नोव्हेंबर २००८ रोजीच्या शासन निर्णयाचा संदर्भ देत डॉ. कांबळे यांनी महापालिका प्रशासनाचे लक्ष संविधान दिनाच्या आयोजनाकडे वेधले आहे. संविधान दिन केवळ औपचारिक कार्यक्रमापुरता मर्यादित न ठेवता, तो लोकसहभागातून आणि शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे.

या निमित्ताने महापालिका मुख्यालयासह सर्व क्षेत्रीय कार्यालये, शहरातील सर्व माध्यमांच्या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन आयोजित करावे. तसेच संविधान जनजागृती कार्यक्रम, संविधान दौड, जलसा, व्याख्याने, निबंध स्पर्धा, परिसंवाद आणि विविध शैक्षणिक उपक्रम राबवावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या कार्यक्रमांसाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पातून आवश्यक निधीची तरतूद करावी आणि सर्व संबंधित विभागांना नियोजनबद्ध आयोजनाच्या सूचना द्याव्यात, असेही डॉ. कांबळे यांनी नमूद केले आहे.

लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या सहभागातून नियोजनाची मागणी

संविधान दिनाच्या कार्यक्रमांचे प्रभावी नियोजन करण्यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण सूचनाही डॉ. सुहास कांबळे यांनी केली आहे. या बैठकीला महापौर, पक्षनेते, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेते, महापालिकेतील पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका आणि नागरिकांना सहभागी करून घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

> “संविधान हे केवळ देशाच्या शासनव्यवस्थेचा दस्तऐवज नसून भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे. संविधानातील मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी शाळा-महाविद्यालयांपासून समाजातील सर्व घटकांपर्यंत संविधानविषयक जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेने संविधान दिन व्यापक लोकसहभागातून साजरा करावा, अशी मागणी आम्ही आमचे नेते आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.”
>
> **- डॉ. सुहास कांबळे,**
> **नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

बहिणींच्या उपचारांची काळजी भावाची; सुनील शेळकेंची भावनिक ग्वाही!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

नातं प्रेमाचं, बंध मायेचा आणि सण भाऊबीजेचा... या भावनिक नात्याला सामाजिक बांधिलकीची जोड देत मावळचे आमदार सुनील शेळके यांनी वडेश्वर येथे आयोजित ‘मायेची भाऊबीज’ सोहळ्यात माता-भगिनींना मदतीचा शब्द दिला. “माझ्या कोणत्याही बहिणीला किंवा तिच्या कुटुंबातील सदस्याला दवाखान्यात दाखल करण्याची वेळ आली, तर रुग्णालयात जाण्यापूर्वी मला एकदा संपर्क करा. उपचारांचा खर्च कमीत कमी कसा होईल, मोफत उपचार कसे मिळतील, यासाठी हा भाऊ पूर्ण ताकदीने प्रयत्न करेल,” अशी भावनिक ग्वाही आमदार शेळके यांनी दिली. त्यांच्या या विधानाने उपस्थित माता-भगिनींमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले.



आंदर मावळमधील वडेश्वर येथे गुरुवारी (दि. १२) आयोजित या भाऊबीज सोहळ्याला माता-भगिनींनी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. वडेश्वर, वहानगाव, नागाथली, माऊ, गभालेवाडी आणि सटवाईवाडी परिसरातील महिलांनी या सोहळ्याला मोठी गर्दी केली होती. आमदार सुनील शेळके यांचे स्वागत करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे, आमदार शेळके यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. या बैलगाडीचे सारथ्य एका महिला भगिनीने केले, तर इतर महिलांनीही बैलगाडीतून सहभागी होत उत्साहात मिरवणूक काढली. महिलांनी भाऊबीजेची गीते गात आमदार शेळके यांचे औक्षण केले आणि त्यांच्याविषयीचे प्रेम व विश्वास व्यक्त केला.

यावेळी बोलताना आमदार शेळके म्हणाले की, माझ्या राजकीय वाटचालीच्या सुरुवातीपासूनच माता-भगिनी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या आहेत. त्यांचे प्रेम आणि विश्वास हीच माझ्या कामाची खरी प्रेरणा आहे. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या पाठीशी भाऊ म्हणून उभे राहणे, ही माझी जबाबदारी आहे. आरोग्याच्या बाबतीत कोणतीही अडचण आल्यास माझ्याशी संपर्क साधावा. उपचारांसाठी कमीत कमी खर्च कसा येईल, तसेच शक्य तेथे मोफत उपचार कसे मिळतील, यासाठी मी प्रयत्नशील राहीन. मात्र, सर्वांना निरोगी आणि दीर्घायुष्य लाभावे, दवाखान्यात जाण्याची वेळच येऊ नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे, असेही त्यांनी सांगितले.

या सोहळ्यात आमदार शेळके यांनी विरोधकांनाही आपल्या खास शैलीत टोले लगावले. त्यामुळे भाऊबीजेच्या भावनिक वातावरणात राजकीय फटकेबाजीचीही रंगत पाहायला मिळाली. कार्यक्रमाला महिलांसह पुरुष नागरिकांचीही मोठी उपस्थिती होती. यावेळी महिलांना फराळाचे वाटप करण्यात आले. श्री. विठ्ठलराव शिंदे, श्री. गणेश खांडगे, गणेश आप्पा ढोरे, साहेबराव कारके यांच्यासह विविध पदाधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य, परिसरातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाऊबीजेच्या निमित्ताने दिलेली आरोग्यविषयक मदतीची ग्वाही आणि बहिणींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा दिलेला शब्द, यामुळे वडेश्वरमधील ‘मायेची भाऊबीज’ सोहळा केवळ सणापुरता मर्यादित न राहता माया, विश्वास आणि सामाजिक बांधिलकीचा सोहळा ठरला.

मदतीसाठी हक्काचा भाऊ!

राजकीय वाटचालीत माता-भगिनींनी दिलेली साथ विसरणार नाही. त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि अडचणीच्या काळात मदतीला धावून जाणे, ही आपली जबाबदारी असल्याचे आमदार शेळके यांनी सांगितले.

भूमिका

पाणीटंचाईचे नवे आव्हान; धरणांतील बाष्पीभवन रोखणार कोण?



महाराष्ट्रासमोर पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असताना धरणांमधील उपलब्ध जलसाठ्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही काळाची गरज बनली आहे. पावसाचे घटते प्रमाण, वाढते तापमान, हवामान बदल आणि पाण्याची वाढती मागणी यामुळे जलसाठ्यांवर मोठा ताण निर्माण होत आहे. त्यातच धरणांमधील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर होणारे बाष्पीभवन ही चिंतेची बाब आहे.

पाणीटंचाईच्या काळात पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना लाखो लिटर पाणी हवेत मिसळून जाणे परवडणारे नाही. त्यामुळे बाष्पीभवन रोखण्यासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

ऑक्टोबर २०२६ अखेर महाराष्ट्रातील धरणांमधील सरासरी जलसाठा ६९.८ टक्क्यांवर आला आहे. मात्र, विभागनिहाय परिस्थिती पाहता मोठी तफावत दिसून येते. कोकणातील धरणांमध्ये ८६.९३ टक्के पाणीसाठा असताना मराठवाड्यात हे प्रमाण केवळ ४१.१४ टक्के आहे. मराठवाड्यातील १०९ लहान-मध्यम सिंचन प्रकल्प कोरडे पडल्याची स्थिती आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि त्याचे संरक्षण यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. अन्यथा पावसाने भरून दिलेला जलसाठा उन्हाच्या तडाख्यात कमी होत राहील आणि ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होईल. बाष्पीभवनामागे वाढते तापमान, सूर्याची थेट किरणे, वाऱ्याचा वेग आणि जलाशयांचा विस्तीर्ण पृष्ठभाग ही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भासारख्या उष्ण व कमी पर्जन्यमानाच्या प्रदेशांत त्याचा परिणाम अधिक जाणवतो. जायकवाडी, विष्णुपुरी यांसारख्या महत्त्वाच्या धरणांमधील पाण्याचे संरक्षण करणे त्यामुळे अत्यावश्यक आहे. पिण्याचे पाणी, शेती आणि उद्योग यांच्यातील पाण्याची मागणी वाढत असताना जलसाठ्यातील प्रत्येक घट भविष्यातील संकटाची तीव्रता वाढवणारी ठरू शकते.

बाष्पीभवन कमी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. धरणांच्या पाण्यावर तरंगणारे सौरऊर्जा प्रकल्प उभारल्यास पाण्याच्या पृष्ठभागाला सावली मिळेल आणि त्याचवेळी वीजनिर्मितीही होईल. त्यामुळे दुहेरी फायदा मिळू शकतो. लहान जलाशयांमध्ये तरंगणारे आवरण वापरणे, तसेच पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करून पृष्ठभागावर संरक्षक थर निर्माण करणाऱ्या तंत्रज्ञानाची चाचणी घेणे शक्य आहे. मात्र, कोणताही उपाय मोठ्या प्रमाणावर राबवण्यापूर्वी त्याची परिणामकारकता, खर्च आणि जलचर पर्यावरणावरील परिणाम तपासणे आवश्यक आहे.

यासोबतच पाण्याचा अनावश्यक वापर रोखणे, कालव्यांमधील गळती कमी करणे, ठिबक आणि तुषार सिंचनाला प्रोत्साहन देणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणे आणि जलसंधारणाच्या कामांना गती देणे गरजेचे आहे. प्रत्येक धरणासाठी बाष्पीभवनाचे स्वतंत्र मोजमाप आणि त्यानुसार कृती आराखडा तयार केला पाहिजे. राज्य सरकारने जलसंपदा विभाग, संशोधन संस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मदतीने यासाठी दीर्घकालीन धोरण आखावे.

पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून भविष्यातील पिढ्यांच्या अस्तित्वाची हमी आहे. त्यामुळे धरणे बांधणे आणि पाणी साठवणे एवढ्यापुरते जलव्यवस्थापन मर्यादित राहू नये. साठवलेले पाणी टिकवणे, त्याचा काटकसरीने वापर करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने होणारे नुकसान कमी करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. बाष्पीभवन रोखण्यासाठी आजच ठोस पावले उचलली नाहीत, तर उद्याचे पाणी संकट अधिक भयावह होऊ शकते. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी शासनाने आता कृतीशील धोरण स्वीकारण्याची वेळ आली आहे.

प्रासंगिक »

योग्य निर्णय

एका गावात दोन कुंभार राहत होते. दोघांचाही माठ बनवण्याचा व्यवसाय होता. पहिला कुंभार कमी वेळात अनेक माठ तयार करायचा; मात्र त्यातले काही माठ लवकर फुटायचे.

दुसरा कुंभार माठ बनवण्यासाठी अधिक वेळ द्यायचा. तो प्रत्येक माठ काळजीपूर्वक तपासायचा. एकदा गावात मोठी जत्रा भरली. पहिल्या कुंभाराने भरपूर माठ आणले; पण ग्राहकांनी ते पाहून नकार दिला. दुसऱ्या कुंभाराचे माठ मात्र लगेच विकले गेले.

पहिल्या कुंभाराला आश्चर्य वाटले. त्याने दुसऱ्या कुंभाराला विचारले, "तू माझ्यापेक्षा कमी माठ बनवतोस, तरी तुझा व्यवसाय चांगला कसा चालतो?"

दुसरा कुंभार हसून म्हणाला, "मी किती माठ बनवले यापेक्षा ग्राहकांच्या हातात किती चांगले माठ दिले, याला महत्त्व देतो."

पहिल्या कुंभाराला आपली चूक समजली. त्यानेही घाई करण्याऐवजी गुणवत्तेकडे लक्ष देण्यास सुरुवात केली.

- तात्पर्य : संख्येपेक्षा गुणवत्ता महत्त्वाची असते.

देशातील महत्त्वाच्या उद्योगक्षेत्रांमध्ये मोजक्याच कंपन्यांचे वर्चस्व वाढत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. विमानतळ, विमान वाहतूक, दूरसंचार, सिमेंट, ऊर्जा आणि बंदरे अशा विविध क्षेत्रांमध्ये काही मोजक्या उद्योगसमूहांची पकड मजबूत होत आहे.

मोजक्यांची मक्तेदारी; सामान्यांच्या हिताचे काय?



मुक्त अर्थव्यवस्थेत स्पर्धेला महत्त्व असले, तरी स्पर्धाच संपून मक्तेदारी निर्माण होणे हे देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि सामान्य ग्राहकांसाठी घातक ठरू शकते. त्यामुळे मुंबई आणि नवी मुंबई विमानतळांच्या वादाकडे केवळ व्यावसायिक निर्णय म्हणून पाहता येणार नाही.

मुंबई विमानतळावरील काही विमानसेवा नवी मुंबई विमानतळाकडे वळवण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोध दर्शविला आहे. हा निर्णय महत्त्वाचा आहे. कारण दोन्ही विमानतळांचे व्यवस्थापन एकाच उद्योगसमूहाकडे असल्याने एका विमानतळावरील व्यवसाय कमी करून दुसऱ्यावरील वर्दळ वाढवण्याचा आग्रह कितपत योग्य, हा प्रश्न उपस्थित होतो. विमान कंपन्यांनीही या स्थलांतराला विरोध केला आहे. प्रवाशांची सोय, विमान कंपन्यांचे व्यावसायिक हित आणि शहराच्या वाहतूक व्यवस्थेचा विचार न करता केवळ विमानतळावरील प्रवासीसंख्या वाढवण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरणार नाही.

देशातील विमान वाहतूक क्षेत्रात इंडिगो आणि एअर इंडिया या दोन कंपन्यांचा मोठा वाटा आहे. इंडिगोचा बाजारातील सुमारे ६६ टक्के हिस्सा असल्याने तिच्या कामकाजातील अडथळ्यांचा परिणाम संपूर्ण देशाच्या विमान वाहतुकीवर होऊ शकतो. यापूर्वी निर्माण झालेल्या विमानसेवा विस्कळीत होण्याच्या परिस्थितीने एकाच कंपनीवरील अवलंबित्व किती धोकादायक ठरू शकते, हे दाखवून दिले आहे. दूरसंचार क्षेत्रातही बीएसएनएल आणि एमटीएनएल या सरकारी कंपन्यांची पीछेहाट झाल्यानंतर खासगी कंपन्यांचे वर्चस्व वाढले आहे. सिमेंट, ऊर्जा आणि इतर क्षेत्रांमध्येही मोजक्या उद्योगसमूहांचा विस्तार वेगाने होत आहे.उद्योगांचा विस्तार होणे किंवा कंपन्यांनी मोठी गुंतवणूक करणे चुकीचे नाही. मात्र, या प्रक्रियेत स्पर्धा, पारदर्शकता आणि ग्राहकांचे हित जपले गेले पाहिजे. एखाद्या कंपनीचे वर्चस्व इतके वाढू नये की तिच्या निर्णयांवर संपूर्ण क्षेत्र अवलंबून राहील. अशा परिस्थितीत ग्राहकांकडे पर्याय उरत नाहीत आणि दर, सेवा व सुविधांबाबत मनमानी होण्याचा धोका निर्माण होतो.

नवी मुंबई विमानतळाचा विकास आणि तेथील सुविधा वाढणे आवश्यकच आहे. मात्र, प्रवाशांवर विमानतळ बदलण्याची सक्ती करण्याऐवजी परिसरातील रस्ते, रेल्वे, सार्वजनिक वाहतूक आणि इतर पायाभूत सुविधांचा विकास करून प्रवाशांना आकर्षित केले पाहिजे. बाजारपेठेतील स्पर्धा ही गुणवत्तेच्या आणि सुविधांच्या जोरावर असावी, दबावाच्या माध्यमातून नव्हे. सरकारने उद्योगवाढीला प्रोत्साहन देतानाच मक्तेदारी रोखण्यासाठी प्रभावी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. कारण उद्योगसमूहांचे हित आणि देशातील कोट्यवधी ग्राहकांचे हित यांत संघर्ष निर्माण झाल्यास प्राधान्य सामान्यांच्या हितालाच मिळाले पाहिजे. मोजक्यांच्या हातात बाजारपेठेची सूत्रे एकवटणे ही विकासाची नव्हे, तर भविष्यातील आर्थिक असमतोलाची धोक्याची घंटा आहे.

।। अभंगवाणी ।।



माकडें मुठीं धरिलें फुटाणे ।
गुंतले ते नेणे हात तेथें ॥१॥

काय तो तयाचा लेखावा अन्याय ।
हित नेणे काय आपुलें तें ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

महाराष्ट्रातील दुष्काळाची तीव्रता वाढली

चार हजार रुपये प्रतिटन दरासाठी राहुरीत शेतकऱ्यांचा एल्गार

महाईन्यूज । अहिल्यानगर

खासदार सुप्रिया सुळे, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते आज दिल्लीत आहेत. संसदेच्या स्थायी समितीच्या बैठकांसाठी ते राजधानीत दाखल झाले आहेत. सुनील तटकरे हे पेट्रोलियम आणि नॅचरल गॅस समितीचे अध्यक्ष, तर सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल हे अर्थविषयक समितीचे सदस्य आहेत. सकाळी साडेअकरापासून या समित्यांच्या बैठका होणार आहेत. दरम्यान, या बैठकांव्यतिरिक्त गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावरही काही चर्चा होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



मंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर हल्ला झाल्याच्या घटनेवरून राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. संजय राऊत यांनी शिरसाट यांच्या घरात दरोडा घाल्यासारखं काय आहे? असं म्हणत त्यांच्या घरातून यापूर्वी पैशांच्या बॅगचे चित्रीकरण समोर आल्याचा उल्लेख करत टोला लगावला. त्यावर प्रत्युत्तर देताना शिरसाट म्हणाले, "ते आमचं वैभव आहे. आमच्याकडे दरोडेखोर येऊ शकतात. ते स्वतः दरोडेखोर आहेत. त्यांना माहीत आहे, एक दरोडेखोर दुसऱ्या दरोडेखोराच्या घरी जात नाही."

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी पुण्यात सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर विलीनीकरणाबाबत बोलताना भुजबळ म्हणाले, सध्या विलीनीकरणाचा खेळ सुरू आहे. एकत्रितरीत्या सगळं झालं पाहिजे. तसेच, नेमकं काय घडत आहे, याबाबत सुनेत्रा पवार आपल्याला विश्वासात घेऊन सांगतील आणि या सगळ्या घडामोडी योग्य वेळी सर्वांना कळतील, असंही त्यांनी नमूद केले.

मुंबईतील जुहू चौपाटीवर छठपूजेच्या आयोजनावरून मनसेने विरोधाची भूमिका घेतली आहे. या वादात अभिनेता सोनू सूदने उडी घेतली असून, १५ नोव्हेंबरला संध्याकाळी जुहू बीचवर छठपूजेसाठी उपस्थित राहणार असल्याचं त्याने सोशल मीडियावरील व्हिडीओद्वारे जाहीर केलं आहे. दुसरीकडे, मनसे कार्यकर्ते कुशल धुरी यांनी आयोजनाविरोधात सांताक्रूझ पोलीस ठाण्यात तक्रार देण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे रविवारी जुहू चौपाटीवर काय घडणार, याकडे लक्ष लागलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्याशी झालेल्या भेटीमुळे राजकीय वर्तुळात रंगलेल्या विलीनीकरणाच्या चर्चांना सुनील तटकरे यांनी पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. "शरद पवारांना भेटणे म्हणजे विलीनीकरणाची चर्चा नव्हे," असे स्पष्ट करत सध्या पक्षांच्या विलीनीकरणाबाबत कुठलीही चर्चा सुरू नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत राजकीय समीकरणांऐवजी प्रामुख्याने राज्यातील भीषण दुष्काळ, शेतकरी आणि जनतेच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती तटकरे यांनी दिली.

मराठवाडा, विदर्भातील भागांना पाणीटंचाईचा दणका

राज्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असून ऐन नोव्हेंबरमध्येच मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. मराठवाड्यातील ३७९ गावे आणि २४९ वाड्यांना मिळून ६०१ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये बीड जिल्ह्यात सर्वाधिक २९६ टँकर सुरू असून छत्रपती संभाजीनगरमध्ये १७९ आणि जालन्यात १०३ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, महिलांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

भुजबळांच्या रुग्णालयातील खोलीत नेमके काय घडले?

महाईन्यूज । नाशिक

राष्ट्रवादी (अजित पवार) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) या दोन्ही गटांच्या विलीनीकरणावर सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर, अजित पवार गटाचे मंत्री तथा ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी वेगवेगळे घटनाक्रम उलगडण्यास सुरुवात केली आहे. छगन भुजबळ यांच्यावर गेल्या वर्षी म्हणजेच २०२५ मध्ये मुंबईतील रुग्णालयात शस्त्रक्रिया झाली होती. जवळपास महिनाभर ते रुग्णालयात होते. त्यावेळी रुग्णालयात भेटण्यासाठी आलेले राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट झाली होती.



विलीनीकरणाच्या अनुषंगाने प्राथमिक चर्चेत उपचार घेत असताना आपणही सहभाग घेतला होता, असा गौप्यस्फोट भुजबळ यांनी केला आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेला मंत्री भुजबळ यांनी दोन्ही गटांच्या प्रमुख नेत्यांच्या रुग्णालयातील भेटीच्या दिलेल्या माहितीमुळे नवीन वळण मिळण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रवादी (अजित पवार) गटाच्या विलीनीकरणावरून मतभेद असल्याची चर्चा आहे. या मुद्द्यावरून पक्षात दोन गट पडले असून, एक गट शरद पवार गटाशी हातमिळवणी करण्यास उत्सुक, तर दुसरा गट त्याच्या विरोधात असल्याचे बोलले जाते. शुक्रवारी नाशिक दौऱ्यावर आलेले राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनी विलीनीकरणावर भाष्य करताना या प्रक्रियेत भाजपची संमती, सत्ताधारी आणि विरोधी गटांत असलेले दोन्ही गट, आपली वैयक्तिक भूमिका, मनसे-शिवसेना (उद्धव ठाकरे) हे पक्ष एकत्र येणे आणि राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणे यांतील फरक व अडचणी आदी विषयांवर मतप्रदर्शन केले. आपली वैयक्तिक भूमिका आपल्या पक्षाचे नेते, आमदार व जिल्हाप्रमुख यांच्यासोबत राहण्याची असल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर विलीनीकरणाची चर्चा झाली नसल्याचे म्हटले होते. परंतु, आता त्यांची विधाने बदलली आहेत. तटकरेंच्या विरोधाभासी विधानांबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नावर मंत्री भुजबळ यांनी, अजित पवार असताना चर्चा झाली, हे मी ऐकले होते. पण, केवळ चर्चा झाली; अंतिम शिक्कामोर्तब झाल्याचे वाटत नाही, असे नमूद केले. यावेळी भुजबळ यांनी मुंबईतील रुग्णालयात शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीतील चर्चेची माहिती दिली.

नेमके काय घडले?


आपल्यावर मुंबईतील रुग्णालयात शस्त्रक्रिया झाली होती. त्यावेळी भेटण्यासाठी जयंत पाटील आले. त्यानंतर पुढील पाच मिनिटांत उपमुख्यमंत्री अजित पवार आले. सुमारे ४० ते ४५ मिनिटे चर्चा झाली. त्यावेळी आपणच जयंत पाटील यांना, किती दिवस लांब राहणार? अजितदादा नेतृत्व करीत असून, सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन केले होते. जयंत पाटील यांनी, अशी तयारी झाली तर राष्ट्रवादी (अजित पवार) गटाशी संलग्न असलेल्या लोकांबाबत, म्हणजेच भाजपचे काय मत असणार, असा प्रश्न केला. त्यावेळी आपणच त्यांना उत्तर दिले. राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे अध्यक्ष अजित पवार इथे बसलेले आहेत.

एनव्हिडियाच्या सीईओंचे तिसरे प्रेमप्रकरण

जेन्सेन हुआंग यांचे कंपनीतीलच आणखी एका महिला कर्मचाऱ्याशी होते संबंध

महाईन्यूज । चीन

जगातील आघाडीची एआय चिप उत्पादक कंपनी 'एनव्हिडिया'चे पदच्युत सीईओ जेन्सेन हुआंग यांच्या राजीनाम्यानंतर या प्रकरणात आता आणखी एक खळबळजनक वळण आले आहे. हुआंग यांचे कंपनीतीलच दुसऱ्या एका महिला कर्मचाऱ्याबरोबर प्रेमसंबंध असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. 'रॉयटर्स' वृत्तसंस्थेने याबाबतचे वृत्त दिले आहे. हुआंग यांनी सीईओ पदाचा राजीनामा दिल्यानंतर अवघ्या काही तासांतच हे तिसरे प्रकरण उघडकीस आल्याने टेक विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.



यापूर्वी हुआंग यांची दोन प्रेमप्रकरणे उघडकीस आली होती. पहिले प्रकरण सिंगापूरमधील व्यावसायिक आणि कथित चिनी गुप्तहेर ॲलिस हुआंग हिच्याशी संबंधित होते, ज्याची कबुली खुद्द जेन्सेन हुआंग यांनी दिली होती. त्यानंतर ११ नोव्हेंबर रोजी 'द न्यू यॉर्क टाइम्स'ने हुआंग यांचे दुसरे प्रेमप्रकरण उघड केले. कंपनीच्या जागतिक आरोग्यसेवा विभागाच्या उपाध्यक्ष किम्बर्ली पॉवेल यांच्याशी हुआंग यांचे संबंध होते. पॉवेल या हुआंग यांच्या नेतृत्वाखाली काम करत होत्या.

या दोन प्रकरणांमुळे निर्माण झालेल्या वादानंतर अखेर १२ नोव्हेंबर रोजी जेन्सेन हुआंग यांनी एनव्हिडियाच्या सीईओ पदाचा राजीनामा दिला. दरम्यान, तिसऱ्या प्रकरणातील संबंधित महिला कर्मचाऱ्याशी संपर्क होऊ न शकल्याने 'रॉयटर्स'ने तिचे नाव जाहीर केलेले नाही. हुआंग यांच्या राजीनाम्यानंतर कंपनीच्या मुख्य वित्तीय अधिकारी कोलेट क्रेस यांच्याकडे हंगामी सीईओ म्हणून कामकाजाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत. कंपनीकडून सध्या कायमस्वरूपी उत्तराधिकाऱ्याचा शोध घेतला जात आहे.

बुधवारी 'न्यू यॉर्क टाइम्स'ने दिलेल्या वृत्तानुसार, ६३ वर्षीय हुआंग यांचे त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या ४८ वर्षीय अधिकारी किम्बर्ली पॉवेल यांच्याशीही संबंध होते. मार्च महिन्यात सॅन होजे येथील एका हॉटेलमध्ये एनव्हिडियाच्या परिषदेदरम्यान ते दोघे जवळीक साधताना एका व्हिडिओत कैद झाले होते. हे दोघेही विवाहित आहेत. एनव्हिडियाने यावर भाष्य करण्यास नकार दिला आहे. पॉवेल २००८ मध्ये एनव्हिडियामध्ये रुजू झाल्या होत्या. कंपनीच्या वेबसाइटनुसार, त्या जागतिक आरोग्यसेवा व्यवसायाची जबाबदारी सांभाळत होत्या. हुआंग यांच्या राजीनाम्यानंतर काही तासांतच 'रॉयटर्स'ने तिसरे प्रकरण समोर आणले आहे. या प्रकरणाची माहिती असलेल्या दोन सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आधी उघड झालेल्या दोन महिलांव्यतिरिक्त हुआंग यांचे कंपनीतीलच दुसऱ्या एका महिला कर्मचाऱ्याशी जवळीकीचे संबंध होते. यावर अद्याप संबंधित महिलेची किंवा एनव्हिडियाची कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही.

नेमके प्रकरण काय आहे?

जेन्सेन हुआंग यांच्या या वादामुळे अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आणि त्याची परिणती त्यांना सीईओ, अध्यक्ष आणि संचालक मंडळावरून पायउतार होण्यात झाली. ८ नोव्हेंबर रोजी एनव्हिडियाच्या संचालक मंडळाने एका स्वतंत्र चौकशीची घोषणा केली होती. ६३ वर्षीय हुआंग हे "परदेशी गुप्तचर यंत्रणेच्या जाळ्यात अडकल्याच्या" वृत्तानंतर ही चौकशी सुरू करण्यात आली. त्याच दिवशी हुआंग यांनी निवेदन जारी करून या संबंधांची कबुली दिली. "माझ्या कृत्याचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही आणि मी याबद्दल मनापासून दिलगिरी व्यक्त करतो," असे त्यांनी म्हटल्याचे 'ब्लूमबर्ग'ने नमूद केले आहे.

आसामच्या काझीरंगा राष्ट्रीय उद्यानजवळ भीषण अपघात; २३ जणांचा मृत्यू

महाईन्यूज । आसाम

आसामच्या काझीरंगा येथे शुक्रवारी भीषण अपघात झाला. पर्यटकांना घेऊन जाणाऱ्या ट्रॅव्हलरची ट्रकशी समोरासमोर धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की, ट्रॅव्हलरचा अक्षरशः चुराडा झालेला पाहायला मिळाला. या घटनेत २० हून अधिक लोक दगावल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तर अनेक लोक ट्रॅव्हलरमध्ये अडकले होते. पोलीस आणि स्थानिकांनी मिळून त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



आसामच्या गोलाघाट जिल्ह्यातील काझीरंगा राष्ट्रीय उद्यानाच्या परिसरात हा अपघात घडल्याचे सांगितले जात आहे. बसमध्ये विद्यार्थ्यांची संख्या अधिक होती, अशी माहिती समोर आली आहे. गोलाघाटचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक स्वप्नील डेका यांनी २३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे.

डेका म्हणाले की, अपघातात २३ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. बसमधून मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. बसमधून नेमके किती लोक प्रवास करत होते, याची मात्र अद्याप माहिती कळू शकलेली नाही. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. काझीरंगा येथे झालेल्या अपघातामुळे मन व्यथित झाले. अपघातात बळी पडलेल्यांची संख्या ऐकून सर्वांनाच धक्का बसला. ज्यांनी आपले प्रियजन गमावले, त्यांच्या दुःखात मी आणि संपूर्ण राज्य सामील आहे. कोणत्याही शब्दांनी हे दुःख कमी होणार नसले तरी मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही एकटे नाही आहात. संपूर्ण आसाम राज्य तुमच्या पाठीशी आहे.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. वाहनात अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात आले. जखमींना सुरुवातीला कोहोरा मॉडेल रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर जखमींना पुढील उपचारांसाठी बोकाखाट, गोलाघाट आणि जोरहाट मेडिकल कॉलेज रुग्णालयात हलविण्यात आले. जखमींच्या उपचारासाठी नऊ रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या. प्राथमिक तपासानुसार, राष्ट्रीय उद्यान परिसरात लागू असलेल्या वेगमर्यादेचे उल्लंघन करून ट्रॅव्हलर वेगाने जात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने समोरून येणाऱ्या कंटेनर ट्रकला धडक बसल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत जखमींना तातडीने सर्वोत्तम वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. स्थानिक आमदार तथा मंत्री अतुल बोरा यांनीही घटनास्थळी पोहोचून मदत व बचावकार्याचा आढावा घेतला.

ट्रॅव्हलरचा वेग जास्त होता?

पोलीस अधीक्षक डेका यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त मिनी बसचा वेग घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक होता. राष्ट्रीय उद्यानाजवळून जाण्यासाठी वेगाची मर्यादा निश्चित केलेली आहे. ट्रकला धडकण्यापूर्वी मिनी बसच्या चालकाचे नियंत्रण सुटले होते, असा दावा त्यांनी केला असल्याचा उल्लेख इंडिया टुडेच्या वृत्तात करण्यात आला आहे. या अपघातात सुरुवातीला २० हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर गोलाघाटचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक स्वप्नील डेका यांनी २३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली. मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू असून, बचावकार्यादरम्यान आणखी मृतदेह बाहेर काढले जात असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

‘रामायण’चा बॉक्स ऑफिसवर ऐतिहासिक धमाका.!

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर, अभिनेत्री साई पल्लवी आणि अभिनेता यश यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या ‘रामायण: पार्ट १’ या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. प्रदर्शनापूर्वीपासूनच प्रचंड चर्चेत असलेल्या या बिग बजेट चित्रपटाने आता कमाईच्या बाबतीत नवा इतिहास रचला आहे. अवघ्या आठ दिवसांत जगभरातील बॉक्स ऑफिसवर १,००० कोटी रुपयांचा टप्पा पार करत चित्रपटाने भारतीय सिनेसृष्टीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत आपले स्थान निर्माण केले आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटाने आठव्या दिवशीही कोट्यवधींची कमाई करत आपली घोडदौड कायम ठेवली आहे. त्यामुळे आता चित्रपटाच्या पुढील कमाईकडे संपूर्ण सिनेसृष्टीचे लक्ष लागले आहे.



दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या या महत्त्वाकांक्षी चित्रपटात रणबीर कपूरने भगवान श्रीरामांची भूमिका साकारली आहे, तर साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत दिसत आहे. यशने रावणाची भूमिका साकारली आहे. भव्य सेट, दमदार कलाकार आणि रामायणाच्या कथेला आधुनिक सिनेमॅटिक स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न यामुळे या चित्रपटाची प्रदर्शनापूर्वीपासूनच मोठी उत्सुकता होती. ‘रामायण: पार्ट १’ च्या बॉक्स ऑफिस कमाईबद्दल सांगायचे झाल्यास, इंडस्ट्री ट्रॅकर सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, चित्रपटाने प्रदर्शनाच्या आठव्या दिवशी भारतात सर्व भाषांमध्ये मिळून अंदाजे ५३.५० कोटी रुपयांची नेट कमाई केली आहे. या दिवशी चित्रपटाचे देशभरात २४,०४२ शो आयोजित करण्यात आले होते.



माही विजचा संताप अनावर

बिग बॉस 20’ च्या घरात सध्या स्पर्धकांमधील वाद चांगलेच रंगताना दिसत आहेत. खेळातील टास्क आणि नॉमिनेशनवरून सुरू झालेले वाद आता थेट स्पर्धकांच्या वैयक्तिक आयुष्यापर्यंत पोहोचले आहेत. अभिनेत्री माही विज आणि स्पर्धक लव्ह गिल यांच्यातील वादाने सध्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. माहीच्या वैवाहिक आयुष्याचा आणि घटस्फोटाचा विषय काढल्याने ती प्रचंड संतापल्याचे पाहायला मिळाले. या वादाचा प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल होत असून माहीच्या प्रतिक्रियेची चर्चा सुरू आहे. बिग बॉसच्या घरात नुकताच नॉमिनेशन टास्क पार पडला. या टास्कदरम्यान उदितीने माहीला नॉमिनेट केले. त्यानंतर माही आणि लव्ह यांच्यात आधीपासून सुरू असलेला वाद पुन्हा उफाळून आला. माहीने लव्हला ‘होमब्रेकर’ म्हटल्याचा राग लव्हच्या मनात होता. याच मुद्द्यावरून तिने माहीला जाब विचारला. मात्र, या वादात लव्हने थेट माहीच्या वैयक्तिक आयुष्याचा उल्लेख केला. तिने अभिनेता जय भानुशालीसोबतच्या माहीच्या घटस्फोटाचा विषय काढला. हे ऐकताच माहीचा राग अनावर झाला. तिने लव्हला स्पष्ट शब्दांत सुनावले की, माझ्या वैयक्तिक आयुष्यापासून दूर राहा. माझ्या घटस्फोटाबद्दल बोलण्याची हिंमत करू नकोस. माझ्या नवऱ्याला या सगळ्या गोष्टींमध्ये ओढू नकोस. यावेळी माही प्रचंड भावूक झाली. तिच्या डोळ्यांत अश्रू आले. रागाच्या भरात तिने ‘इथेच तुकडे करून टाकेन’, अशा आक्रमक शब्दांत लव्हला प्रत्युत्तर दिले. या घटनेमुळे बिग बॉसच्या घरातील वातावरण चांगलेच तापले. या संपूर्ण वादाची सुरुवात माहीने लव्हसाठी वापरलेल्या ‘होमब्रेकर’ या शब्दामुळे झाली. लव्हने माहीला ‘पिंग पॉन्ग’ असे म्हटले होते. त्यानंतर स्काऊट ओपीसोबत झालेल्या संभाषणात माहीने लव्हसाठी ‘होमब्रेकर’ हा शब्द वापरल्याचे समोर आले. हा शब्द ऐकल्यानंतर लव्हने माहीला त्याचा जाब विचारला. मात्र, माहीने हा शब्द काश्मी किंवा घराबाहेरील कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात वापरला नसल्याचे स्पष्ट केले. तरीही दोघींमधील वाद थांबला नाही. उलट या वादात इतर स्पर्धकांनीही उडी घेतल्याने परिस्थिती आणखी चिघळली.



टायगरवर गोळीबारानंतर श्रॉफ यांची पहिली प्रतिक्रिया

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफच्या कारवर भररस्त्यात झालेल्या गोळीबाराच्या घटनेने संपूर्ण सिनेसृष्टी हादरली होती. भरवस्तीत एका लोकप्रिय अभिनेत्याच्या गाडीवर गोळ्यांचा वर्षाव होतो, हल्लेखोर बेधडकपणे घटनास्थळावरून पळ काढतात आणि या सगळ्या थरारात अभिनेता थोडक्यात बचावतो... या घटनेने केवळ टायगरचे चाहतेच नव्हे, तर संपूर्ण श्रॉफ कुटुंब हादरले होते. मुलाच्या जीवावर बेतू शकणाऱ्या या प्रसंगानंतर वडील जॅकी श्रॉफ काय प्रतिक्रिया देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर जॅकी यांनी या घटनेवर भाष्य केले असून, त्यांचे उत्तर ऐकून अनेकजण भावूक झाले आहेत. कोणताही संताप, नाराजी किंवा आक्रमकपणा न दाखवता त्यांनी अत्यंत शांत आणि तात्त्विक शब्दांत आपली भावना व्यक्त केली. ‘वरच्याला हात जोडतो आणि पुढे जातो. एक अपघात होता, तो घडून गेला. तोदेखील एक अनुभव होता,’ असे ते म्हणाले. त्यांच्या या मोजक्या शब्दांतून आयुष्यातील कठीण प्रसंग स्वीकारून पुढे जाण्याचा संदेश मिळत आहे. टायगर श्रॉफसोबत घडलेल्या या धक्कादायक घटनेबाबत जॅकी श्रॉफ यांनी दैनिक भास्करशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुलासोबत घडलेल्या प्रसंगावर आपली प्रतिक्रिया दिली. जॅकी म्हणाले, ‘वरच्याला हात जोडतो आणि पुढे जातो. एक अपघात होता, तो घडून गेला. तोदेखील एक अनुभव होता.’ जॅकी यांच्या या वक्तव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मुलाच्या बाबतीत इतकी गंभीर घटना घडल्यानंतरही त्यांनी कोणावरही आरोप-प्रत्यारोप करण्याऐवजी देवाचे आभार मानत पुढे जाण्याचा विचार व्यक्त केला.

न्यूझीलंडकडून भारताचा लाजिरवाणा पराभव!

मॅट हेन्रीने घेतल्या ६ विकेट्स; न्यूझीलंडचा २४४ धावांनी दणदणीत विजय

महाईन्यूज । माउंट माउंगानुई

भारताला चौथ्या वनडे सामन्यात न्यूझीलंड संघाविरूद्ध लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला आहे. न्यूझीलंड संघाने भारताला ८९ धावांवर सर्वबाद केलं. यासह न्यूझीलंडने भारतावर २४४ धावांनी दणदणीत विजय मिळवला. यासह पाच सामन्यांची वनडे मालिका आता २-१ अशी आहे. मॅट हेन्री व विल यंग हे न्यूझीलंड संघाच्या या मोठ्या विजयाचे हिरो ठरले. मॅट हेन्रीने या ९.४ षटकांत २७ धावा देत ६ विकेट्स घेतल्या.



न्यूझीलंड संघाने प्रथम फलंदाजी करताना ३३३ धावांचा डोंगर उभारला आणि भारताला विजयासाठी ३३४ धावांचं आव्हान दिलं. प्रत्युत्तरात भारतीय संघाची सुरूवात प्रचंड खराब झाली. मॅट हेन्रीने पहिल्याच षटकात न्यूझीलंड संघाच्या विजयाचा पाया रचला. त्याने पहिल्या षटकात भारताच्या दिग्गजांना माघारी धाडला. रोहित शर्मा पहिल्याच चेंडूवर गोल्डन डकवर बाद केलं. त्यानंतर पाचव्या चेंडूवर विराटला बोल्ड केलं आणि सहाव्या चेंडूवर श्रेयस अय्यरला पायचीत करत एकही धाव न देता ३ विकेट्स घेतल्या.

तीन विकेट्सच्या धक्क्यातून भारतीय संघ सावरला नाही आणि संघाने ठराविक अंतराने विकेट्स गमावल्या. इशान किशन, अक्षर पटेल व नमन धीर यांनी कडवी झुंज देत संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. इशान व अक्षरने चौथ्या विकेटसाठी ४४ धावांची भागीदारी रचली. मॅथ्यू फिशरने अक्षरला बाद करत ही भागीदारी तोडली व अक्षर २१ धावा करत बाद झाला. त्यानंतर उत्कृष्ट लयीत असलेल्या मॅट हेन्रीने २१व्या षटकात इशान किशनला ३१ धावांवर क्लीन बोल्ड करत संघाला अजून एक धक्का दिला. नमन धीर २१ धावा करत बाद झाला. यानंतर खालच्या फळीतील फलंदाज एकेरी धावसंख्येवर बाद झाले. परिणामी भारतीय संघ फक्त ८९ धावांवर सर्वबाद झाला. मॅट हेन्रीने या सामन्यात ६ विकेट्स, तर मॅथ्यू फिशरने ३ विकेट्स आणि काईल जेमिसनने १ विकेट घेतली.

भारताने नाणेफेक जिंकत न्यूझीलंड संघाला गोलंदाजीसाठी पाचारण केलं. आकिब नबीच्या दुसऱ्याच षटकात विल यंगच्या दोन कॅच भारताकडून ड्रॉप झाल्या आणि त्याचाच फटका संघाला बसला. विल यंगने या सामन्यात १०८ चेंडूत १४ चौकार व ४ षटकारांसह १२५ धावांची शतकी खेळी साकारली. तर टीम सायफर्टने अर्धशतकी खेळी साकारत त्याच्यासह पहिल्या विकेटसाठी ८५ धावांची भागीदारी रचली. त्यानंतर फिन ॲलनने झटपट ४१ धावा केल्या. यानंतर मधल्या फळीतील फलंदाजांनी थोड्या अधिक प्रमाणात धावांचं योगदान दिलं आणि ३३३ धावांचा डोंगर उभारत संघ सर्वबाद झाला.

भारताकडून या सामन्यात आकिब नबी, गुरनूर ब्रार, अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर अर्शदीप सिंग व नमन धीर यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

न्यूझीलंड संघाने जर पाचवा सामना जिंकला तर ही वनडे मालिका बरोबरीत सुटेल. त्यामुळे पाऊस असतानाही पहिल्या दोन सामन्यात भारताने मेहनतीने सामने जिंकत मालिकेत आघाडी मिळवली होती, त्यानुसार पाचव्या सामन्यात विजय मिळवण्यावर भारताचं लक्ष्य असेल.

सँडपेपर गेट प्रकरणातील ख्वाजाच्या दाव्यांवर कमिन्स संतापला!

महाईन्यूज । ऑस्ट्रेलिया

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने उस्मान ख्वाजाने आपल्या आत्मचरित्र 'सब्र'मध्ये केलेले आरोप फेटाळून लावले आहेत. २०१८ मध्ये केपटाऊन कसोटीदरम्यान ऑस्ट्रेलियाच्या संपूर्ण संघाला सँडपेपरच्या वापराबाबत माहिती होती, हा ख्वाजाचा दावा कमिन्सने पूर्णपणे चुकीचा आणि निरर्थक असल्याचं म्हटलं आहे. शुक्रवारी सकाळी सिडनीतील क्रिकेट सेंट्रल येथे पत्रकार परिषदेत बोलताना कमिन्सने स्पष्ट केलं की, चेंडूच्या एका बाजूला सँडपेपर घासून चेंडूचा आकार बदलला जात असल्याची माहिती आपल्याला वैयक्तिकरित्या नव्हती.



कमिन्स म्हणाला, "उस्मानचं म्हणणं आहे की आम्हा सर्वांना याबाबत माहिती होती, तेव्हा त्याचा अर्थ मैदानात सँडपेपर नेला जात असल्याचं आम्हाला माहीत होतं, असा असेल तर त्याचं म्हणणं १०० टक्के चुकीचं आहे. गेल्या आठ वर्षांपासून मी सातत्याने हीच भूमिका मांडत आलो आहे. असा प्रकार घडत असल्याची मला कोणतीही माहिती नव्हती. मात्र, उस्मानने यापेक्षाही गंभीर आरोप केले आहेत. सँडपेपरचा वापर करून चेंडूचा आकार बदलल्याच्या कटाचा सूत्रधार मी आणि इतर खेळाडू होतो, असं त्याने म्हटलं आहे. हा दावा पूर्णपणे निरर्थक आणि साफ चुकीचा आहे."

कमिन्सने पुढे बोलताना ख्वाजाच्या वक्तव्यामुळे आपल्याला धक्का बसल्याचंही सांगितलं. तो म्हणाला, "या आठवड्यात मला जेव्हा समजलं की, सँडपेपर वापरताना काळजी घेण्याची सूचना उस्मानने कॅमेरून बॅनक्रॉफ्टला दिली होती, तेव्हा मला खरोखरच धक्का बसला. मला माहीत असलेला उस्मान हा असा नाही. गेल्या आठ वर्षांत ऑस्ट्रेलियन क्रिकेटची संस्कृती पुन्हा उभी करण्यात ज्या संघाने मदत केली, त्या संघाचा भाग असलेला उस्मान असा प्रकार घडू नये यासाठी प्रयत्न करणारा असायला हवा होता. उस्मान माझा मित्र होता. मात्र, मित्र एकमेकांच्या आयुष्याशी आणि प्रतिष्ठेशी इतक्या बेफिकिरीने वागत नाहीत."

सँडपेपर गेट प्रकरण घडलं तेव्हा पॅट कमिन्स हा २४ वर्षांचा नुकताच ऑस्ट्रेलिया संघात आलेला युवा खेळाडू होता. कमिन्सला सँडपेपरच्या वापराबाबत विचारण्यात आलं असता त्याने स्पष्ट नकार दिला. तो म्हणाला, "सँडपेपर मैदानात नेला जाणार आहे, याची मला माहिती होती का? नाही, बिलकुल नाही. त्याचा वापर केला जाणार आहे, हे मला माहीत होतं का? नाही. मैदानावर त्याचा वापर होणार आहे, याचीही मला कल्पना नव्हती."

ख्वाजा आणि कमिन्स या दोघांपैकी कोणाचं म्हणणं खरं आहे, असा प्रश्न पत्रकाराने विचारला. त्यावर कमिन्स म्हणाला, "मी जे सांगतोय, ती माझी बाजू आहे. त्यामुळे उस्मानचं म्हणणं चुकीचं आहे, असं मला वाटतं. मला ऑस्ट्रेलियन क्रिकेटची खूप आवड आहे. या क्रिकेटने मला खूप काही दिलं आहे. मात्र, या संपूर्ण प्रकरणाचा ऑस्ट्रेलियन क्रिकेटवर परिणाम होत आहे. उस्मानने ज्या पद्धतीने आपली बाजू मांडली, ती अत्यंत बेफिकिरीने मांडल्याचं मला वाटतं. याचा अनेक लोकांवर परिणाम होत आहे आणि सध्या मला याच गोष्टीचा त्रास होत आहे. मला हे अजिबात योग्य वाटत नाही."

कमिन्स पुढे म्हणाला, "या आठवड्यात मी वाचलेल्या सर्व गोष्टींपैकी हा सर्वात गंभीर आरोप आहे, असं मला वाटतं. मी ज्या पदावर काम करतो, ते पद एखाद्या व्यक्तीला त्याच्या त्वचेच्या रंगामुळे मिळू शकत नाही, असा अर्थ यातून निघतो. हा खूप मोठा आरोप आहे. असा दावा करण्यासाठी ठोस पुरावे असणं आवश्यक आहे. मात्र, मला तसं अजिबात वाटत नाही. अनेक मुद्द्यांवर माझं उस्मानशी एकमत आहे. पण ज्या गोष्टींशी मी सहमत नाही, त्याबाबत मी त्याला स्पष्टपणे सांगतो. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार होण्यासाठी विशिष्ट त्वचेचा रंग असणं आवश्यक आहे, या त्याच्या विधानाशी मी अजिबात सहमत नाही."

सँडपेपर गेट प्रकरणामुळे क्रिकेटविश्वात मोठी खळबळ उडाली होती. बॉल टेम्परिंग केल्याप्रकरणी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात कठोर कारवायांपैकी एक करण्यात आली होती. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने बॅनक्रॉफ्टवर नऊ महिन्यांची, तर तत्कालीन कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि उपकर्णधार डेव्हिड वॉर्नर यांच्यावर सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून एक वर्षाची बंदी घातली होती.

ऑस्ट्रेलियाच्या तिघांवर करण्यात आलेली कारवाई अवाजवी आणि अतिशय कठोर होती, असं मतही पॅट कमिन्सने व्यक्त केलं. तो म्हणाला, "त्यावेळी केलेल्या कारवाईमागचा उद्देश योग्य असू शकतो. मात्र, खेळाडूंना दिलेली शिक्षा आणि न्यायाच्या दृष्टीने विचार केला, तर माझ्यामते वैयक्तिकरित्या ही कारवाई गरजेपेक्षा खूपच कठोर होती. ती मर्यादिपलीकडे गेली होती. असं मत व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. पण त्यावरून संपूर्ण संघाला या प्रकाराची माहिती होती, असा निष्कर्ष काढणं ही खूप मोठी गोष्ट आहे. हा मुद्दा माझ्या मते झालेल्या अन्यायापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे."

कमिन्सने पुढे असेही सांगितले की, क्रिकेटमध्ये बॉल टेम्परिंग होण्याचे प्रकार यापूर्वीही घडले आहेत. तो म्हणाला, "बॉल टेम्परिंगचे प्रकार क्रिकेटमध्ये अनेकदा घडले आहेत. इतर संघही असे प्रकार करत असल्याच्या चर्चा तुम्ही ऐकल्या असतील. अशा प्रकारात खेळाडू पकडले गेले, तेव्हाही त्यांना केवळ किरकोळ दंड किंवा डिमेरिट गुण देऊन सोडण्यात आल्याची उदाहरणं आहेत."

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।
दि. 14 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

गिनीज विश्वविक्रमाची नोंद करणारी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' २९ नोव्हेंबरला मोशीत!

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून जलसंवर्धनासाठी रॅली

यंदा ५ व २५ किलोमीटरचे पर्याय, सायकलपटूंसाठी मोफत नोंदणी सुरू

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

सायकलींची सर्वांत लांब रांग उभारून २०२३ मध्ये गिनीज विश्वविक्रम नोंदविणाऱ्या 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन'चे यंदाचे आयोजन रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी मोशी येथे करण्यात आले आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाची यंदाची रॅली सकाळी ६ वाजता हिंदुभूषण छत्रपती संभाजी महाराज स्मारकाजवळील पीआयईसीसी मैदानावरून (PIECC GROUND) सुरू होणार आहे. सहभाग मोफत असून नोंदणीला सुरुवात झाली आहे.

इंद्रायणी नदीची स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी सुरू झालेल्या या उपक्रमाला यापूर्वीही मोठा प्रतिसाद मिळाला आहे. २०२३ मध्ये सायक्लोथॉनच्या टीमने जर्मनीचा तत्कालीन विक्रम मोडून 'LONGEST LINE OF BICYCLES (STATIC)' या प्रकारात गिनीज विश्वविक्रम नोंदवला. त्या वर्षीच्या सायकल रॅलीत ३० हजारांहून अधिक सायकलस्वार सहभागी झाले होते.

तसेच, २३ नोव्हेंबर २०२५ रोजी मोशी येथे झालेल्या सायक्लोथॉनमध्ये ५१ हजार ३०० हून अधिक सायकलस्वार सहभागी झाले होते, तर कार्यक्रमाला सुमारे ७९ हजार नागरिकांची एकूण उपस्थिती होती. यावर्षी आतापर्यंतचे रेकॉर्ड मोडीत काढण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे.



> "२०२३ मध्ये पिंपरी-चिंचवडच्या सायक्लोथॉनची गिनीज विश्वविक्रमात नोंद झाली. त्या लोकसहभागाच्या बळावर यंदा पाणी बचतीचा संदेश अधिकाधिक घरांपर्यंत पोहोचवायचा आहे. आपल्या क्षमतेनुसार ५ किंवा २५ किलोमीटरचे अंतर निवडा, मोफत नोंदणी करा आणि २९ नोव्हेंबरला मोशीमध्ये इंद्रायणीसाठी सायकल चालवूया."
>
> - **महेश लांडगे, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

> "इंद्रायणीच्या संवर्धनासाठी वर्षभर नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. घरात पाणी जपून वापरणे आणि नदीत कचरा जाणार नाही याची काळजी घेणे, या गोष्टी प्रत्येक जण आजपासून करू शकतो. सायक्लोथॉनमधून हा संदेश आपल्या कुटुंबापर्यंत आणि परिसरापर्यंत नेऊया."
>
> - **डॉ. निलेश लोंढे, प्रमुख, अविरत श्रमदान.**

यंदा ५ आणि २५ किलोमीटरचे दोन पर्याय

सहभागींना आपल्या क्षमतेनुसार ५ किंवा २५ किलोमीटर अंतर निवडता येईल. प्रत्येक सहभागीला टी-शर्ट, सहभागाचे पदक आणि अल्पोपाहार देण्यात येणार आहे. इच्छुकांनी अधिकृत पोस्टरवरील QR कोड स्कॅन करून मोफत नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमाच्या आयोजनात आणि सहकार्यात अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांचा सहभाग आहे. अधिक माहितीसाठी 99226 85487 या क्रमांकावर संपर्क करावा. ऑनलाईन रजिस्ट्रेशनसाठी HTTPS://MAHESHKLANDGE.COM/RIVERCYCLOTHON/ लिंकवर भेट द्या.

‘महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स’च्या शीर्षकातून ‘महाराष्ट्र’ वगळा

प्रस्तावित चित्रपटाच्या नावाला अखिल भारतीय नाट्य परिषदेचे भाऊसाहेब भोईर यांचा आक्षेप

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

‘महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स’ या प्रस्तावित चित्रपटाच्या शीर्षकातून ‘महाराष्ट्र’ हा शब्द वगळून चित्रपटाचे नाव बदलावे, अशी मागणी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब सोपानराव भोईर यांनी निवेदनाद्वारे केली आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीशी संबंधित विषयाला संपूर्ण राज्याचे नाव जोडल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रतिष्ठेला धक्का पोहोचू शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली.



महिलांवरील लैंगिक अत्याचार, शोषण आणि अंधश्रद्धेचे वास्तव चित्रपटातून मांडणे आवश्यक आहे. अशा विषयांवरील समाजप्रबोधनाचे स्वागत केले पाहिजे, असे भोईर यांनी निवेदनात म्हटले आहे. कलात्मक अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आदर राखताना चित्रपटाच्या शीर्षकात महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाचा आणि जनभावनांचा विचार व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य, छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम, राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक न्यायाचा वारसा, महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे समतेचे कार्य, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रुजवलेली संविधानिक मूल्ये यांचा संदर्भ भोईर यांनी निवेदनात दिला. या परंपरेतून महाराष्ट्राने देशाला समता, न्याय आणि बंधुतेचा आदर्श दिल्याचे त्यांनी नमूद केले.

भोईर हे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती संघटनेचे उपाध्यक्ष आणि पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष आहेत. लोकप्रतिनिधी आणि नाट्यक्षेत्रातील पदाधिकारी या नात्याने त्यांनी हा आक्षेप नोंदवला आहे. चित्रपटाचा समाजप्रबोधनाचा उद्देश कायम राखून शीर्षकात बदल करण्यासाठी संबंधितांनी कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये विनापरवाना दुचाकी टॅक्सींवर कारवाईचे आश्वासन

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

शहरात विनापरवाना प्रवासी वाहतूक करणाऱ्या ऑनलाइन दुचाकी टॅक्सींवर प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि वाहतूक पोलिसांच्या संयुक्त मोहिमेद्वारे कठोर कारवाई करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्याची माहिती महाराष्ट्र रिक्षा पंचायतीच्या शिष्टमंडळाने दिली. दुचाकी टॅक्सी चालकांच्या परवान्यांची आणि कागदपत्रांची तपासणी करावी, तसेच चालकांची पोलिस पडताळणी होते का, याची चौकशी करावी, अशी मागणी शिष्टमंडळाने बैठकीत केली.





ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने २२ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी साडेबारा वाजता वाहतूक पोलिस उपायुक्त कार्यालयात अधिकाऱ्यांची भेट घेतली. सहायक पोलिस आयुक्त डॉ. विक्रांत देशमुख आणि पोलिस निरीक्षक अमित धुमाळ यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली.

मुंबईतील जुहू येथील गोळीबार प्रकरणातील एक आरोपी ऑनलाइन दुचाकी टॅक्सी सेवेसाठी चालक म्हणून काम करत असल्याचा दावा शिष्टमंडळाने बैठकीत केला. या प्रकरणाचा दाखला देत ऑनलाइन टॅक्सी कंपन्या चालकांना सेवेत घेताना त्यांची पोलिस पडताळणी करतात का, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली.

“विनापरवाना दुचाकी टॅक्सी सेवा बंद झाली पाहिजे आणि ऑटो-टॅक्सी चालकांना शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार भाडे मिळाले पाहिजे. या मागण्यांसाठी आमचा लढा सुरूच राहील,” असे महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे राज्य युवक अध्यक्ष शुभम तांदळे यांनी सांगितले.

बैठकीला राजन नायर, कलिंदर शेख, शुभम तांदळे, अनिल शिरसाट, धनंजय कुदळे, विशाल ससाने, रंजीत शहा, बापू कांबळे, अमोल शिंदे, सोमनाथ तिकोटे, संभाजी सावंत, अरुण कांबळे, अशोक जगताप आणि ज्ञानेश्वर कदम उपस्थित होते.

वाकडमधील तक्रारीची चौकशी होणार

या प्रकरणी महापालिका आयुक्तांशी दूरध्वनीवर चर्चा करून जलवाहिनीची तातडीने दुरुस्ती करावी, रस्त्यावरील खड्डे बुजवावेत आणि संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी चिखले आणि चिखले-मराठे यांनी केली. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार करण्यात आली. विभागाने तातडीने दुरुस्ती हाती घेतली आणि सकाळी काम पूर्ण केले, असे निवेदनात म्हटले आहे.

भोसरीतून थेट पुरंदर विमानतळापर्यंत भुयारी मार्गाची योजना

‘पाताळ लोक’ प्रकल्पासाठी पुणे महापालिकेने उचलले पुढचे पाऊल

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पुण्याच्या उत्तर भागातून दक्षिणेकडे आणि पुढे प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंतचा प्रवास अधिक वेगवान करण्यासाठी पुणे महापालिकेने भुयारी मार्गांची आखणी केली आहे. ‘पाताळ लोक’ प्रकल्पांतर्गत भोसरी ते उंड्रीदरम्यान २३ किलोमीटर लांबीचा बोगदा केला जाणार आहे. हाच बोगदा पुढे महामेट्रोतर्फे बोपदेव घाटातून पुरंदर विमानतळापर्यंत नेला जाणार आहे. तर भूगाव ते एरंडवणेदरम्यान आठ किलोमीटरचा भुयारी मार्ग प्रस्तावित आहे. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी तज्ज्ञ सल्लागार नेमण्यास महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी मंजुरी दिली आहे.



प्रकल्पात महत्त्वाचे; दोन्ही मार्गांमुळे

- ३१ किलोमीटरचे बोगद्यांचे जाळे निर्माण होणार
- पुरंदर विमानतळापर्यंत थेट संपर्क रस्ता
- भोसरी ते उंड्री बोगद्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरे उत्तर-दक्षिण जोडली जाणार
- मेट्रो, एचसीएमटीआर आणि दोन्ही रिंगरोडशी जोडणीचे नियोजन

असा असेल बोगदा

भूगाव ते डी.पी. रस्ता एरंडवणे

- भूगाव येथे रामनदी इनर रिंगरोडजवळ बोगदा सुरू होणार
- डुक्कर खिंड, कर्वेनगरमार्गे राजाराम पूल ते एरंडवणेदरम्यान हा बोगदा संपेल
- हा बोगदा एरंडवणे येथे एचसीएमटीआर प्रकल्पाला जोडणारा असेल
- हा बोगदा सलग आठ किलोमीटरचा असेल

भोसरी ते उंड्री

- भोसरीपासून हा बोगदा सुरू होणार
- संगमवाडीपर्यंत तो सलग येईल
- संगमवाडी येथे बोगद्यातून आत आणि बाहेर पडण्याची व्यवस्था केली जाणार
- संगमवाडी येथून धोबी घाट, कात्रज-कोंढवा रस्ता
- खडी मशीन चौक येथे आत-बाहेर जाण्याची व्यवस्था
- उंड्रीपासून पुढे पुरंदरपर्यंत काही मार्ग एलिव्हेटेड तर काही बोगद्याचे मार्ग असणार
- उंड्री ते पुरंदर विमानतळादरम्यान महामेट्रो काम करणार

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यांवरील ताण कमी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘पाताळ लोक’ अर्थात भुयारी मार्ग प्रकल्पाची संकल्पना मांडली होती. सुरुवातीला येरवडा ते कात्रज या मार्गाची घोषणा केली, पण तो व्यवहार्य नसल्याचे स्पष्ट झाले. आता स्वारगेट ते शनिवारवाडा या मार्गाची व्यवहार्यता तपासण्यासाठी महापालिकेने जाहिरात काढली आहे.

वाहतूक कोंडीचा विचार करताना केवळ पुणे शहर म्हणून विचार न करता त्यामध्ये पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांचाही संयुक्तपणे विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी या तिन्ही संस्थांनी वाहतूक पोलिसांसोबत चर्चा करून भोसरी ते उंड्री आणि भूगाव ते डी.पी. रस्ता, एरंडवणे हे दोन बोगदे अस्तित्वात आणण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे.

या दोन्ही बोगद्यांची आखणी करताना पुणे महापालिकेने वाहतूक पोलिसांच्या मदतीने टॉमटॉमचा ओरिजिन-डेस्टिनेशन डेटा, गुगल ट्रॅफिक, प्रत्यक्ष वेळेतील वाहतूक माहिती, सीएमपी डेटा आणि प्रवासाच्या पद्धतींचा अभ्यास केला. प्रमुख वाहतूक मार्गांवरील कोंडी, रस्त्यांमधील जोडणीतील त्रुटी आणि पर्यायी मार्गांची उपलब्धता या बाबींचा विचार करण्यात आला आहे.

हे बोगदे आखताना एचसीएमटीआर, इनर रिंग रोड आणि आउटर रिंगरोडचा विचार करून त्यांचे मार्ग निश्चित केले आहेत, असे महापालिकेच्या प्राथमिक अहवालात नमूद केले आहे. त्यामुळे नव्या नियोजनात शहरातील सर्व प्रमुख वाहतूक मार्गांचे एकात्मिक जाळे उभारताना मेट्रो व एचसीएमटीआरला हे पूरक असतील याचा विचार केला आहे.

माता अमृतानंदमयी देवी (अम्मा) यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

निःस्वार्थ प्रेम, माया, करुणा आणि मानवतेच्या सेवेचा वसा जपणाऱ्या विश्वमाता अमृतानंदमयी देवी (अम्मा) यांना मराठी पत्रकार संघातर्फे जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.



शनिवारी, (दि.१४ नोव्हेंबर) सकाळी १० वाजता, निगडी यमुनानगर मधील माता अमृतानंदमयी मठ येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते अम्मा यांना हा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी पुढारी माध्यम समूहाचे अध्यक्ष डॉ. योगेश प्रतापसिंह जाधव असणार आहेत. यावेळी दैनिक सकाळच्या संपादक शीतल पवार, एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक, पुढारी पुणे चे संपादक सुनील माळी, जय महाराष्ट्र चॅनलच्या संपादक वृषाली कदम, दै. सुराज्य चे संपादक राकेश टोळ्ये यांच्यासह विविध संपादक, ज्येष्ठ पत्रकार, लोकप्रतिनिधी आणि उद्योजक प्रमुख उपस्थितीत राहणार आहेत. आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, सुनील शेळके, व्ही. जे. डेव्हलपर्स चे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जावडेकर, कोहिनूर समूहाचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल आणि बीव्हीजी इंडिया लि. चे संस्थापक अध्यक्ष हनुमंतराव गायकवाड आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

माता अमृतानंदमयी देवी यांनी प्रेम, करुणा, मानवसेवा आणि आध्यात्मिक कार्याच्या माध्यमातून देश विदेशात मानवतेचा संदेश पोहोचविला आहे. समाजातील गरजू आणि वंचित घटकांसाठी त्यांनी विविध सेवाभावी उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या या अतुलनीय कार्याचा गौरव करण्यासाठी तसेच मातृत्व, माणुसकी आणि निःस्वार्थ सेवे प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण जोशी यांनी सांगितले.

या जीवनगौरव पुरस्कार सोहळ्यास पत्रकार, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक क्षेत्रातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण जोशी यांनी केले आहे.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

SCHOOL OF
LEGAL STUDIES

Learn Law. Lead Change.

BA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM

BBA LLB (Hons)
5 YEARS INTEGRATED PROGRAM



#2
(IIRF Rankings 2026)
Among New Age Private Universities- In Maharashtra

Moot Court & Practical Training

Legal Aid Support

ADMISSIONS OPEN 2026

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in